# जागतिक भूमिगत दिवस साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** नदी, ऐतिहासिक व उंच इमारती, फ्लायओव्हर्स, सध्याची मेट्रो लाइन आणि रेल्वे लाइन खालून मुंबईतील पहिल्या भूमिगत मेट्रोसाठी भुयारीकरण करण्यात आल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडचे प्रकल्प संचालक एस. के. गुप्ता यांनी सांगितले. ४ डिसेंबर या जागतिक भुयारीकरण दिवसाचे औचित्य साधत अंडरग्राउंड स्पेसचा उपयोग - आजच्या काळाची गरज या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. यंग ग्रुप ऑफ इंटरनॅशनल टनेलिंग अॅण्ड अंडरग्राउंड स्पेस असोसिएशनद्वारे भारतासह २८ राष्ट्रीय तरुण सदस्य गटांसोबत 3 डिसेंबर रोजी २४ तासांच्या ऑनलाइन बैठकीमध्ये जागतिक भुयारीकरण दिवस साजरा करण्यात आला. यावेळी मुंबई शहरामध्ये भुयारीकरणाच्या आव्हानांवर चर्चा करण्यात आली.